दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.२३ फेब्रुवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १७९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 23 Feburary 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 179 | Pages 4 | Rate 4 Rs

### आता 'गाव तिथे एसटी' नव्हे, 'आदिवासी पाडा तिथे एसटी'

**मुंबई**–सह्याद्रीच्या धुक्याने वेढलेल्या डोंगररांगा असोत की मेळघाटचे दुर्गम भाग, आता प्रत्येक आदिवासी पाड्यापर्यंत 'लालपरी' पोहोचणार आहे. 'केवळ गाव तिथे एसटी नाही, तर आता आदिवासी पाडा तिथे एसटी' असा ठाम निर्धार करत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी राज्याच्या विकासाचा एक नवा अध्याय सुरू केला आहे.महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने जारी केलेल्या पत्रकानुसार, सह्याद्री व मेळघाटच्या कुशीत, धुक्याने वेढलेल्या डोंगरदऱ्यांमध्ये, आजवर केवळ पायवाटांनीच ओलांडलेले अंतर आता 'लालपरी च्या चाकांनी मोजले जाणार आहे. राज्यातील दुर्गम आदिवासी पाड्यापर्यंत एसटीची सेवा पोहोचवण्याचा ऐतिहासिक संकल्प परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी जाहीर केला आहे. 'आता केवळ गाव तिथे एसटी नाही, तर आदिवासी पाडा तिथे एसटी,' असा ठाम निर्धार करत त्यांनी विकासाचा नवा अध्याय सुरु केल्याची घोषणा केली.

# देवेंद्र फडणवीसांकडून मंत्री नरहरी झिरवाळांना क्लीन चिट

## लाचखोरी प्रकरणात मंत्र्यांचे नाव नाही, फडणवीसांनी दिली माहिती

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

अन्न आणि औषध प्रशासन विभागातील कर्मचारी राजू ढेरिंगे याला लाच घेताना रंगेहात पकडल्याच्या घटनेनंतर अडचणीत आलेले मंत्री नरहरी झिरवाळ यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी क्लीन चिट दिली आहे. या लाचखोरी प्रकरणात संबंधित मंत्र्यांविरोधात कोणताही ठोस पुरावा समोर आला नसल्याचे स्पष्ट करत, जर पुरावे उपलब्ध असतील तर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग स्वतःहून योग्य ती कारवाई करते, असे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी अँटी करप्शन ब्युरोला पूर्णपणे स्वातंत्र्य दिले आहे. उद्या माझ्याही कार्यालयात असा कोणी व्यवहार केला तरी देखील त्याच्यावर कारवाई होईल. मंत्र्याच्या विरोधात पुरावा असता तर कारवाई झाली असती. कोणतीही कारवाई करण्याआधी एसीबी आधी माहिती घेते. त्यावेळचे संभाषणदेखील रेकॉर्ड केले जाते, त्याच्या नोंदी घेतल्या जातात.




आतापर्यंत समोर आलेल्या गोष्टींमधून मंत्र्यांचे कुठेही नाव आलेले नाही, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तोंडावर अन्न आणि औषध प्रशासन विभागातील लाचखोरीचे प्रकरण उजेडात आल्याने मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अडचणीत वाढ झाली असून, या मुद्द्यावरून सोमवारी अधिवेशनात विरोधक सरकारला धारेवर धरण्याची शक्यता आहे. या प्रकरणाची चौकशी सध्या सुरू असून, त्यातून सर्व सत्य समोर येईल आणि आपण सभागृहात कोणत्याही प्रश्नाला उत्तर देण्यास पूर्णपणे तयार आहोत, अशी स्पष्टोक्ती मंत्री झिरवाळ यांनी यावेळी दिली आहे.दरम्यान, अन्न आणि औषध प्रशासन विभागातील लाचखोरी प्रकरणाचे पडसाद उमटत असून, मंत्री नरहरी झिरवाळ यांनी त्यांचे वादग्रस्त खासगी सचिव रामदास गाडे यांना या विभागातून तातडीने कार्यमुक्त केले आहे. या कारवाईअंतर्गत गाडे यांना त्यांच्या मूळ आस्थापनेत म्हणजेच पशुवैद्यकीय विभागात परत पाठवण्याचे आदेश मंत्र्यांनी दिले असून, या निर्णयामुळे संबंधित विभागातील भ्रष्टाचाराच्या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे.

# एकाच कुटुंबावर दोन आघात कांबळे कुटुंबाला अशोक डकाचा आधार

## मुलाचे अपघाती निधन तर वडिलांना हृदयविकाराचा झटका

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील ब्रह्मगांव येथील ऊसतोड मजूर बाळु रामभाऊ कांबळे याचे कर्नाटक राज्यातील मुदुळ जिल्ह्यात दि.१४ जानेवारी २०२६ रोजी अपघाती निधन झाले . वडील रामभाऊ कांबळे यांना या अपघाती निधनाचा मोठा धक्का बसला कमी वयात मुलाचे झालेले अपघाती निधन त्या वडिलांच्या जिव्हारी लागले. सतत आपल्या मुलाच्या आठवणी त्या ( वडिल रामभाऊ कांबळे ) यांना भेडसावत होत्या. तारुण्यात आलेला मुलगा अचानक जाण्याने त्या वडिलांवर ( कुटुंबावर ) दुःखाचा डोंगर कोसळला होता. वडिलांनी मुलाच्या निधनाचा धसका घेतला होता..



मुलगा गेला या दुःखात रामभाऊ सतत रडत होता.. त्या दुःखात त्याने स्वतःची काळजी घेतली नाही कुटुंबाला झालेल्या डोंगराएवढ्या दुःखातून तो स्वतःला सावरू शकला नाही आणि त्यालाही मुलाच्या जाण्यामुळे हृदय विकासाचा झटका आला आणि त्याचीही प्राणज्योत दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मावळली.. एकापाठोपाठ एक आघात या कांबळे कुटुंबावर झाले. यांची माहिती कळताच मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांनी कांबळे कुटुंबाची सांत्वन पर भेट घेतली व मी कांबळे कुटुंबाच्या सोबत आहे आसा धीर दिला.. मुदुळ येथील ज्या कारखान्याला मुलगा गेला होता त्या संबंधित कारखान्याकडून काही आर्थिक मदत मिळते का ? या साठीही प्रयत्न करतो असा शब्द दिला. व कुटुंबाला स्वतः तर्फे काही आर्थिक मदत करण्याचा शब्द दिला. या सांत्वन पर भेटीवेळी त्याच्या सोबत मानवी हक्क अभियानचे तालुकाध्यक्ष मधुकर कांबळे, काँग्रेस सोशल मीडिया समन्वयक, जिल्हाध्यक्ष तथा मा.विभागाचे उपाध्यक्ष सुधाकर कांबळेसह, युवा नेते रमेश जाधव, अंजन कांबळे, नितीन कांबळे, मनोज गायकवाड, अरुण कांबळे,प्रशांत कांबळे, संतोष कांबळे, अनिल कांबळे, संग्राम कांबळे, नवनाथ लोखंडे, गणेश कांबळे, दादा कांबळे, समाधान कांबळेसह असंख्य गावकरी मंडळी व महिला उपस्थित होत्या.

# चिखला येथील प्रकार पुरोगामी महाराष्ट्राला काळिमा फासणारा-आमटे

## शिव,शाहू,फुले,आंबेडकर,साठे यांच्या महाराष्ट्रात दुर्दैवी प्रकार

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

देशात महाराष्ट्र पुरोगामी म्हणून देशाला दिशा देणार राज्य शिव, शाहू, फुले, आंबेडकर, साठे यांच्या विचाराचा वारसा सांगणाऱ्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये शिवरायांचे स्मारक काढू देत नाही म्हणून महिलेला मारहाण हा प्रकार अतिशय निंदानीय आहे, अशी प्रतिक्रिया शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हा प्रमुख राजेंद्र आमटे यांनी दिली.

शिव,शाहू, फुले, आंबेडकर, साठे, अहिल्यादेवी होळकर अशी विचाराची खाण असणारा महाराष्ट्र पत्नाकडे जात असल्याचे पाहून शरमेने खाली मन जात आहे आरोपीला जात नसते असते ती फक्त विकृत मानसिकता महाराष्ट्रातील विकृत मानसिकता ठेचून काढल्या पहिजेत.काय चाललं आहे महाराष्ट्रांत? अत्याचार, बलात्कार, विनयभंग, हत्या, अठरापगड जाती गुण्यागोविंदाने नांदत असताना



हे होणारे प्रकार अतिशय दुर्दैवी आहेत चिखला येथील प्रकार पुरोगामी महाराष्ट्राला काळिमा फासणारा आहे शिव शाहू फुले आंबेडकर साठे अहिल्यादेवी होळकर यांच्या विचाराचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रामध्ये निदानीय आहे आरोपींना तत्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# दलित समाजाबद्दल आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या तरुणावर केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

सोशल मीडियाच्या माध्यमातून दलित समाजाबद्दल अत्यंत खालच्या भाषेतआक्षेपार्ह पोस्ट करून जातीय भावना दुखावल्या प्रकरणी आणि एका व्यक्तीला धमकावल्या प्रकरणी केज पोलिसांनी एका तरुणाविरुद्ध अ‍ॅट्रॉसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.रोहन उत्तम गलांडे रा. चिंचोलीमाळी असे गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव आहे.

याप्रकरणी लखन व्यंकट हजारे वय ३६,रा. भिमनगर,केज यांनी फिर्याद दिली आहे.या फिर्यादीनुसार,दि.१७ फेब्रुवारी रोजी लखन हजारे यांनी रोहन गलांडे याला दि.१ जानेवारी रोजी केलेल्या एका आक्षेपार्ह पोस्टबद्दल विचारणा केली होती. त्यावेळी रोहनने माफी मागून पुन्हा असे करणार नाही असे सांगितले होते.

मात्र,दि.२१ फेब्रुवारी २०२६ रोजी रोहनने पुन्हा आपल्या फेसबुक अकाउंटवरून आणि व्हॉट्सॲप ग्रुप्सवर (उदा. SG-1 मराठी न्यूज,वंचित बहुजन आघाडी,दिव्य लोकप्रभा




वाचक समूह) दलित समाजाचा अपमान करणारी आणि महिलां बद्दल अत्यंत अश्लील मजकूर असलेली पोस्ट व्हायरल केली.इतकेच नव्हे तर,त्याने आपल्या व्हॉट्सॲप स्टेटसच्या माध्यमातून फिर्यादी लखन हजारे यांचे नाव घेऊन त्यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.या प्रकारानंतर लखन हजारे यांनी केज पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून रोहन गलांडे याच्यावर खालील कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे भारतीय न्याय संहिता (इछ्ड),२०२३ कलम ३५६(२),३५२,३५१(३), ७९,१९६ अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ कलम ३(१)(ी) आणि ३(१)(ी) या घटनेमुळे परिसरात खळबळ माजली असून, सोशल मीडियावरजातीय द्वेष पसरवणाऱ्यांविरुद्ध कडक पावले उचलली जात आहेत.पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# माहिती दडवणाऱ्या अधिकाऱ्यांना राज्य माहिती आयोगाचा दणका-ॲड.सदानंद वाघमारे

## भूमी अभिलेख अधिकाऱ्यांचा पारदर्शकतेला नकार

## आयोगाचे ३० दिवसांत माहिती द्या अन्यथा कारवाई!

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र यांनी माहिती अधिकार प्रकरणात महत्त्वाचा आदेश देत संबंधित अधिकाऱ्यांना ३० दिवसांच्या आत माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच माहिती देण्यात टाळाटाळ झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत देण्यात आले आहेत.

मिळालेल्या आदेशानुसार, दुसरे अपील क्र. २९९२/२०२५ संदर्भात सुनावणी पार पडली. अपीलार्थी यांनी माहिती अधिकार कायद्याच्या कलम १९(३) अंतर्गत अपील दाखल ड.सदानंद वाघमारे यांनी दाखल केले होते. या प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नियमानुसार माहिती उपलब्ध करून दिली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले. सदर प्रकरणात अपीलार्थी यांनी



कार्यालयातील कर्मचाऱ्यांची नावानिशी उपस्थिती व रजा नोंदीची माहिती मागितली होती. मात्र निर्धारित कालावधीत माहिती न दिल्यामुळे माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींचा भंग झाल्याचे आयोगाने नमूद केले आहे.आयोगाने आदेशात स्पष्ट केले की, संबंधित जन माहिती अधिकारी व उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, बीड यांनी आदेश प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत माहिती विनामूल्य उपलब्ध करून द्यावी. तसेच यापूर्वी माहिती न दिल्याबाबत कारणे स्पष्ट करावीत.याशिवाय, जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय यांना देखील या आदेशाच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आयोगाने नमूद केले की,आदेशाचे पालन न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर पुढील शिस्तभंगात्मक व कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

ही सुनावणी छत्रपती संभाजीनगर येथील आयोग कार्यालयात पार पडली. या आदेशामुळे माहिती अधिकार अर्जदारांना मोठा दिलासा मिळाला असून, शासन कार्यालयांमध्ये पारदर्शकता वाढण्यास मदत होणार असल्याचे मत व्यक्त ड.सदानंद वाघमारे केले आहे.

# संपादकीय

## मुलांना तणाव मुक्त ठेवा

मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या अशा बारावी-दहावी परीक्षा राज्यात सुरू झाल्या आहेत. या परीक्षेच्या कार्यकाळात मुलं अभ्यासाच्या तणावातून जात असतात. तेव्हा पालकांनी मुलांच्या आरोग्याकडे बारकाईने लक्ष द्यावयास हवे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून राज्यात सुरू झाली आहे. या परीक्षा पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण अशा ९ विभागीय मंडळांच्या मदतीने घेत असतात. बारावीच्या परीक्षेत आतापर्यंत १०९ गैरप्रकार झाले असून कोकण विभागीय मंडळामध्ये एकही गैरप्रकार झालेला नाही. तेव्हा परीक्षा मंडळाने अधिक दक्ष राहणे आवश्यक आहे. दोन्ही परीक्षा मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेत. पालकांनी मुलांच्या तणावाच्या लक्षणाकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे. म्हणजे त्यांना परीक्षाकाळात तणावमुक्त परीक्षा देता येईल. त्यासाठी पालकांनी परीक्षेच्या कार्यकाळात परीक्षा सुरू असताना मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.परीक्षेचे वेळापत्रक जसजसे जवळ येते तसतसे मुलांचा ताण वाढण्याला मदत होत असते. जी मुले नियमित अभ्यास करतात त्यांना कोणत्याही प्रकारचा ताण जाणवत नाही. तेव्हा आई-वडिलांनी मुलांची केवळ परीक्षेपुरती काळजी न घेता नियमितपणे काळजी घेतली पाहिजे. बऱ्याच वेळा परीक्षा जवळ आली की मुलांची डोकेदुखी, पोटदुखी, अंगदुखी, झोप न येणे, मूल चिडचिडे होणे असे दिसून येते. अशा वेळी पालकांनी मुलांना विश्वासात घेऊन सकारात्मक दृष्टिकोन मुलांबरोबर ठेवावा. याचा परिणाम म्हणून त्यांना प्रोत्साहन मिळून ती अधिक जोमाने अभ्यास करून तणावमुक्त होऊन परीक्षेला आनंदाने सामोरे जातील. पालकांनी आपली मुले परीक्षेत यशवंत होण्यासाठी परीक्षेच्या कालावधीत मुलांच्या मनात तणाव वाढणार नाही याची काळजी घ्यावी. तेव्हा मुलांच्या अभ्यासातील प्रगतीचा भूतकाळ कसा होता किंवा त्यांनी काय केले याची उजळणी न करता त्यांच्या भविष्याचा विचार करून त्यांच्याशी सुसंवाद साधावा. मुलांच्या परीक्षेविषयी त्यांच्या मनातील भीती दूर करावी. त्यांना आनंदित ठेवावे. पालकांनी अभ्यासासाठी जास्त सक्ती करू नये. मुलांनासुद्धा आपल्या परीने अभ्यास करू द्यावा. तेव्हा आपल्यावरती आता धाक नाही असे मुलांनी न समजता अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. यात आपलेच नुकसान होणार आहे, याची मुलांनी दक्षता घ्यावी. यासाठी मुलांनी आज्ञाधारक राहिले पाहिजे.महत्त्वाची बाब म्हणजे, आपले मूल परीक्षेच्या काळात पुरेसे जेवण करीत आहे का? याकडे सुद्धा पालकांनी लक्ष द्यायला हवे. मुलांची बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी त्यांचे आरोग्य चांगले असावे लागते. त्यासाठी त्यांना संतुलित आहार नियमित मिळणे आवश्यक आहे. म्हणजे त्यांची ऊर्जा टिकून राहते. परीक्षा काळात मुलांच्या जेवणात बदल करू नये. तसेच त्यांना पुरेशी झोप घेण्यास सहकार्य करावे. मुलांना पुरेशी झोप मिळाल्यामुळे ते अधिक एकाग्रतेने अभ्यास करू शकतात. त्यात टीव्ही पाहणे आणि आरोग्यासाठी व्यायाम अतिशय महत्त्वाचा असतो. काही पालक रात्रभर अभ्यास करा असे मुलांना सांगत असतात किंवा अभ्यासिकेत पाठविले जाते. अशा वेळी पालकांनी सुद्धा मुलांचा कल लक्षात घेणे गरजेचे असते. कारण इतरांपेक्षा आपल्या मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहिती असतात. अभ्यासाबरोबर आरामाचीसुद्धा मुलांना नितांत आवश्यकता असते. याकडे सुद्धा पालकांनी अधिक लक्ष द्यायला हवे. याचा जास्त फायदा आपल्या मुलांना होत असतो. याची कल्पना पालकांना असायला हवी. अभ्यासाबरोबर घराचीसुद्धा स्वच्छता जास्त महत्त्वाची असते. त्याचबरोबर पालकांनी स्वत: शांत राहणे महत्त्वाचे असते. परीक्षा काय दररोज होत नाहीत. मात्र परीक्षेचा काळ मुलांप्रमाणे पालकांसाठीही महत्त्वाचा असतो. या कार्यकाळात मुलांना तणावमुक्त होण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे असते, मात्र यात जास्त वेळ घालवू नये. मुलांच्या अभ्यासासाठी कशी मदत होईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. यात जास्त वेळ घालवू नये. परीक्षेच्या काळात मुलांचा ताण वाढल्यास मुलांनी त्याचा सामना कसा करावा याचा योग्य सल्ला घ्यावा. या काळात मुलांना अभ्यास करताना व्यत्यय येणार नाही याची पालकांनी काळजी घ्यावी. आरामात अभ्यास करेल अशा जागेत त्याला अभ्यास करण्यासाठी बसवावे. परीक्षा सुरू असल्याने आपल्या मुलांना प्रेरित करण्यासाठी प्रोत्साहित करावे. विद्यार्थी आणि परीक्षा यांचा कसा सबंध असतो. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यावर आपले ध्येय सहज पार करू शकतो याची आठवण मुलांना करून द्यावी. काही वेळा परीक्षा काळात मुलांना चिंताग्रस्त होणे साहजिकच आहे. मात्र सकारात्मक दृष्टिकोन मुलांनी ठेवायला पाहिजे. ही नैसर्गिक प्रतिक्रिया असून त्यावर सहज मात करता आली पाहिजे. यासाठी वर्षभरात झालेला अभ्यास दरदिवशी करणे आवश्यक आहे. अभ्यास झाला असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता अधूनमधून अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. म्हणजे त्या अभ्यासक्रमाची उजळणी होऊन मुलांच्या मनात तणाव निर्माण होत नाही. यात अभ्यासात चुकारपणा मुलांनी करू नये. अभ्यासासाठी मुलांवर दबाव वाढवू नये तर मुलांच्या समस्या सुद्धा पालकांनी समजून घेणे गरजेचे असते. परीक्षा झाल्यावर पेपरमध्ये कठीण प्रश्न कोणते होते? किती लिहिलाय? पेपर पूर्ण लिहिलाय काय? असे अनेक प्रश्न विचारत बसण्यापेक्षा आता पुढील परीक्षा कोणत्या विषयाची आहे. त्या विषयावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. परीक्षेला घरातून जाताना मुलांना आधार दिला पाहिजे. तसेच त्यांना धीर द्यावा म्हणजे मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त परीक्षा देऊ शकतात. तेव्हा मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त होण्यासाठी पालकांनी प्रोत्साहन द्यावे.

# नंदुरबार जिल्ह्याची ऐतिहासिक झेप: क्षयरोग दुरीकरणात महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी.**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत भारत सरकारमार्फत जाहीर करण्यात आलेल्या २०२५ च्या रँकिंगमध्ये नंदुरबार जिल्ह्याने संपूर्ण महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक पटकावून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. दुर्गम आणि अतिदुर्गम भाग असलेल्या या जिल्ह्याने प्रगत शहरांना मागे टाकत आरोग्य सेवेत नवा वस्तुपाठ घालून दिला आहे. दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथे आयोजित एका विशेष गौरव सोहळ्यात केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांच्या हस्ते जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. महेंद्र चव्हाण यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, आरोग्य सचिव इ. रवींद्रन आणि इतर मान्यवर उपस्थित होते.नंदुरबार जिल्ह्याला २०२५ सालासाठी ७२ हजार ७८० संशयित रुग्ण तपासण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. मात्र, आरोग्य विभागाने प्रत्यक्ष ७३ हजार ९१५ संशयितांची तपासणी केली. सरकारी आणि



**शासनाने ठरवून दिलेल्या सर्वच निकषांमध्ये नंदुरबार जिल्ह्याने ९६ ते १०० टक्के काम पूर्ण केले आहे. सांघिक प्रयत्न आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यामुळेच आम्ही राज्याच्या क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर पोहोचू शकलो आहोत.**
**– डॉ. महेंद्र चव्हाण, जिल्हा क्षयरोग अधिकारी, नंदुरबार.**

खासगी क्षेत्रातील निदानाचे उद्दिष्ट २९५० असताना प्रत्यक्षात २९१९ रुग्णांचे यशस्वी निदान करण्यात आले.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, २०२३ मध्ये क्षयरोगामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण ६.३०% होते, ते प्रभावी उपचार आणि लवकर निदानामुळे २०२५ मध्ये अवघ्या २.२४% पर्यंत खाली आणण्यात प्रशासनाला यश आले आहे.

**महिलांसाठी 'स्पेशल महिला एक्स-रे पथक'**

दुर्गम भागातील महिला अनेकदा संकोचामुळे तपासणीसाठी पुढे येत नाहीत. ही अडचण ओळखून डॉ. महेंद्र चव्हाण यांनी एक अभिनव उपक्रम राबवला. त्यांनी केवळ महिलांचे 'स्पेशल महिला एक्स-रे पथक' तयार केले. यामध्ये महिला तंत्रज्ञ, महिला चालक आणि सहायक यांचा समावेश होता. या पथकाने २७० ठिकाणी शिबिरे घेऊन महिलांची मोठ्या संख्येने तपासणी केली, ज्यामुळे निदानाचे प्रमाण वाढले.दुर्गम पाड्यांवरील रुग्णांना दवाखान्यात येणे शक्य नसल्याने, आरोग्य विभागाने आधुनिक हॅन्डहेल्ड एक्स-रे मशीन आणि एक्स-रे व्हॅन थेट रुग्णांच्या दारापर्यंत नेली.महिला रेडिओलॉजिस्ट डॉ. विद्युलता पटले यांनी सामाजिक बांधिलकी जपत तब्बल १३,४६० एक्स-रे विनामूल्य तपासून दिले. त्यांच्या या कार्याचाही राज्यस्तरावर गौरव करण्यात आला.जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली हे यश साध्य झाले आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रविंद्र सोनवणे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनय सोनावणे आणि त्यांच्या संपूर्ण पथकाने, ज्यात आशा सेविका, आरोग्य सेवक आणि प्रयोगशाळा तंत्रज्ञांचा समावेश आहे, अहोरात्र मेहनत घेतली.

# तळोद्यात दहावीच्या परीक्षेचा 'आदर्श' श्रीगणेशा प्रशासन आणि शिक्षकांच्या नियोजनाचे सर्वत्र कौतुक

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या लेखी परीक्षांना दिनांक २० पासून तळोदा शहरात अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात सुरुवात झाली. शहरातील 'शेठ के. डी. हायस्कूल' व 'न्यू हायस्कूल' या दोन्ही परीक्षा केंद्रांवर पहिल्याच दिवशी प्रशासनाचे चोख नियोजन आणि शिक्षकांचे समर्पण पाहायला मिळाले.

विद्यार्थ्यांचे स्वागत आणि सकारात्मक वातावरण परीक्षेचा ताण न घेता विद्यार्थ्यांनी हसतमुख चेहऱ्याने केंद्रावर हजेरी लावली. शाळा प्रशासनाच्या वतीने विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांमधील भीती कमी होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत




झाली. परीक्षेचे पावित्र्य जपण्यासाठी प्रवेशद्वारावर नियमानुसार तपासणी करण्यात आली, मात्र ही प्रक्रिया अत्यंत सामंजस्याने पार पडली. परीक्षा निर्विघ्न पार पडण्यासाठी केंद्र प्रशासनाने कोणतीही कसर सोडलेली नाही.

केंद्रसंचालक निलेश सूर्यवंशी यांच्या सूक्ष्म नियोजनाखाली संपूर्ण प्रक्रिया राबवली जात आहे. इमारत संचालक भास्कर मराठे यांनी प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांसाठी पुरेसा प्रकाश, पिण्याचे पाणी आणि सुव्यवस्थित आसनव्यवस्था उपलब्ध करून दिली आहे.मुख्याध्यापक जे. एल. सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी अहोरात्र परिश्रम घेत असून, विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी ते सदैव तत्पर आहेत.यंदा परीक्षेची पारदर्शकता टिकवण्यासाठी दोन्ही केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर आहे. तंत्रज्ञानाच्या या वापरामुळे शिक्षकांवरील कामाचा ताण हलका झाला असून, विद्यार्थ्यांनाही शिस्तबद्ध पद्धतीने पेपर सोडवण्याची प्रेरणा मिळत आहे. कोणत्याही अनुचित प्रकाराला वाव मिळू नये यासाठी पोलीस प्रशासन आणि भरारी पथकांचेही मोलाचे सहकार्य लाभत आहे.विद्यार्थ्यांनी कोणत्याही दडपणाशिवाय आणि निर्भयपणे परीक्षा द्यावी, संपूर्ण प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे आवाहन केंद्र प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. एकूणच, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या समन्वयामुळे तळोद्यातील ही दोन्ही परीक्षा केंद्रे जिल्ह्यात एक 'आदर्श केंद्र' म्हणून नावारूपास येत आहेत. या सुव्यवस्थित नियोजनाबद्दल पालक वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

# बोरद चौफुलीवर एसटीचा थरार; किरकोळ अपघाताने उडाला भडका!

## प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे प्रवाशांचा जीव टांगणीला; वयोवृद्धांचे हाल थांबणार कधी?

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

शहादा-तळोदा या मुख्य रस्त्यावरील बोरद चौफुलीवर दिनांक २१ रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास एसटी बसने एका मोटरसायकलला धडक दिली. रिव्हर्स घेण्याच्या नादात झालेल्या या किरकोळ अपघाताचे रूपांतर मोठ्या वादात झाले. सुदैवाने, मोटरसायकल स्वार सुरक्षित असला तरी, या घटनेने बोरद ग्रामस्थांच्या संयमाचा बांध आता सुटला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या ठिकाणी वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे आजच्या घटनेने सिद्ध झाले आहे.सकाळी ७ ते ९ या वेळेत बोरद चौफुलीवर मजुरांची आणि शाळेला जाणाऱ्या मुलांची मोठी गर्दी असते. बोरद परिसर हा शेतीच्या माध्यमातून समृद्ध असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात केळी, पपई आणि उसाचे उत्पादन घेतले जाते. या पिकांच्या कापणी आणि तोडणीसाठी मजुरांची मोठी वर्दळ येथे असते. फक्त मजुरांचीच गर्दी नाही, तर या ठिकाणी मालाची



वाहतूक करणारे ट्रक आणि ट्रॅक्टर देखील मोठ्या प्रमाणात उभे असतात. अशा गजबजलेल्या ठिकाणी शहादा आणि तळोद्याकडून येणाऱ्या एसटी बसेस वळवल्या जातात. आजचा अपघात हा बस चालकाच्या चुकीपेक्षा तिथे असलेल्या नियोजनाच्या अभावाचा आणि जागेच्या कमतरतेचा परिणाम आहे. चौफुलीवर प्रवाशांसाठी सुरक्षित जागा नसल्याने प्रवाशांना जीव मुठीत धरून बसची वाट पाहावी लागते.गावात रस्ते अरुंद आहेत हे पालुपद लावून एसटी प्रशासन बसेस गावाबाहेरूनच वळवत आहे. मात्र, यामुळे गावातील वयोवृद्ध नागरिकांना अर्धा ते पाऊण किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. वृद्ध, महिला आणि रुग्णांचे हाल पाहूनही प्रशासन ढिम्म आहे. गावातील वयोवृद्ध लोकांची हीच प्रमुख मागणी आहे की, एसटी बसेस गावात याव्यात आणि तिथूनच वळवण्यात याव्यात, जेणेकरून त्यांना चौफुलीपर्यंत चालत यावे लागणार नाही. जर गावात बस वळवण्यासाठी अडचण असेल, तर ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन रस्त्यावरील अतिक्रमणे तातडीने मोकळी करून द्यावीत, जेणेकरून बस चालकांना वळण घेणे सोपे होईल.लोकांच्या समस्या सुटण्यासाठी प्रशासनाने काही ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. सर्वात पहिले म्हणजे, वयोवृद्धांचा त्रास वाचवण्यासाठी एसटी बसेस थेट गावातील मुख्य थांब्यापर्यंत नेण्यात याव्यात. त्यासाठी गावातील ज्या चौकात बस वळवताना अडचण येते, तिथले अतिक्रमण प्रशासनाने आणि ग्रामपंचायतीने मिळून तातडीने काढून रस्ता मोकळा करावा. तसेच, सकाळी ७ ते ९ या गर्दीच्या वेळी चौफुलीवर वाहतूक पोलिसांची किंवा होमगार्डची नियुक्ती करावी, जेणेकरून बेशिस्त पार्किंग आणि गर्दीवर नियंत्रण राहील. याव्यतिरिक्त, चौफुलीवर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी लोखंडी बॅरिकेड्स उभारणे आवश्यक आहे, जेणेकरून वळण घेणाऱ्या बसचा फटका प्रवाशांना बसणार नाही.आजचा किरकोळ अपघात ही प्रशासनासाठी धोक्याची घंटा आहे. मजुरांची गर्दी, अवजड वाहनांची रांग आणि त्यात बसचे जीवघेणे वळण यांमुळे येथे कधीही मोठा अनर्थ घडू शकतो. वयोवृद्धांच्या समस्या आणि प्रवाशांची सुरक्षा याकडे दुर्लक्ष करून प्रशासन नेमके काय साध्य करू पाहत आहे? वेळीच जागे होऊन यावर तोडगा काढणे गरजेचे आहे.

# धडगाव अपघात: मृतांच्या नातेवाईकांसाठी ३२ लाखांची मदत मंजूर; ॲड.गोवाल दादा पाडवींच्या पाठपुराव्याला मोठे यश!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

काही दिवसांपूर्वी धडगाव तालुक्यातील चांदसैली घाटात झालेल्या भीषण पिकअप अपघाताने संपूर्ण नंदुरबार जिल्हा हादरला होता. या अपघातात ८ निष्पाप नागरिकांनी आपला जीव गमावला, ज्यामुळे अनेक कुटुंबे उघड्यावर आली होती. मात्र, या संकटकाळात पीडित कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत खासदार डव्होकेट गोवाल पाडवी यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आता मोठे यश आले आहे. मुख्यमंत्री सहायता निधीतून या ८ मृतांच्या वारसांसाठी एकूण ३२ लाख रुपयांची मदत शासनाकडून मंजूर करण्यात आली आहे.

अपघाताचे गांभीर्य आणि कुटुंबांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन ही मदत विभागण्यात आली आहे:

४ कुटुंबांना: प्रत्येकी ५ लाख रुपये.

४ कुटुंबांना: प्रत्येकी ३ लाख रुपये.

अपघात झाल्यानंतर केवळ शोक व्यक्त न करता, खा.डव्होकेट गोवाल पाडवी यांनी तातडीने शासन दरबारी धाव घेतली होती. मृतांच्या कुटुंबांना आर्थिक आधार मिळावा यासाठी त्यांनी प्रशासनाकडे आग्रही मागणी लावून धरली होती. त्यांच्या या जनहिताच्या भूमिकेमुळेच अत्यंत कमी वेळात ही मदत मंजूर झाली आहे. दुःखाच्या डोंगराखाली दबलेल्या या कुटुंबांना मदतीचा हात मिळाल्यामुळे सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे. संकटाच्या वेळी मदतीला धावून जाणारा नेता म्हणून गोवाल दादांनी पुन्हा एकदा आपली ओळख सिद्ध



**कुटुंबातील माणूस गेल्याचे दु:ख पैशाने भरून काढता येत नाही, मात्र उघड्यावर पडलेल्या या कुटुंबांना सावरण्यासाठी आणि त्यांच्या मुलांच्या भविष्यासाठी हा आर्थिक आधार मिळवून देणे आमचे कर्तव्य होते.**
**– खा.ॲड.गोवाल पाडवी.**

# तीन गावात हातभट्टी दारूचे अड्डे उध्वस्त

## साडे सतरा हजार रुपयाचे दारू बनविण्याचे साहित्य नष्ट

# पोलीस निरीक्षक देविदास चोपडे स्वतःच उतरले मैदानात

दैनिक वादळ वार्ता

**श्रीक्षेत्र माहूर । प्रतिनिधी**

माहूर तालुक्यात हातभट्टी दारू बनविणाऱ्या वर गुन्हे दाखल झाल्याने तस्कर कोमात जात असताना हातभट्टी दारू बनविण्यासाठी नवीन तस्कर तयार होत असल्याने खबर मिळताच पोलीस निरीक्षक देविदास चोपडे हे स्वतःच हातभट्टी अड्ड्यावर धाडी टाकून दारू बनविण्याचे साहित्य नष्ट करत आरोपींना जेर बंद करून जबरदस्त महाप्रसाद देण्यात येत असल्याने दि २१ रोजी एकाच दिवसात तीन गावात धाडी टाकून साडेसातरा हजार रुपयाचे दारू बनविण्याचे साहित्य नष्ट करण्यात येऊन तिघांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याची घटना घडल्याने हातभट्टी दारू बनविण्याचा विचार करणाऱ्यात घबराट पसरली आहे.माहूर तालुक्यात बेरोजगारीत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने अनेक युवक व्यसनाधीन बनत चालले असून व्यसन करण्यासाठी स्वस्त पर्याय म्हणून हातभट्टी दारूला जग मान्यता मिळालेली आहे त्यामुळे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अविनाश कुमार उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली खेड्यापाड्यात सुरू असलेले अनेक हातभट्टीचे अड्डे उध्वस्त करण्यात येऊन गुन्हे दाखल झाल्याने नवनवीन पिदाडे कमी खर्चात दारू काढून मोजमजा करण्याच्या नादात हातभट्टी लावण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत परंतु पोलिसांचे खबरी प्रत्येक गावात असल्याने माहिती मिळताच पोलीस निरीक्षक देविदास चोपडे स्वतःच हातभट्टी अड्डे उध्वस्त करत गुन्हे दाखल करून वेळप्रसंगी गुन्हेगारांना जबरदस्त महाप्रसाद ही देत आहेत.दि २१ रोजी खबर मिळताच पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी स्वतः पोलिसासमवेत इवळेश्वर येथील नाल्यात धाड टाकून पन्नास लिटर दारूबविण्याचे रसायन तसेच कसार पेठ येथे २०० लिटर तर वानोळा येथे १०० लिटर मोह फुलाचे रसायन तसेच इतर साहित्य नष्ट करून तिघांवर गुन्हे दाखल केले असून एकूण १७ हजार ५०० रुपयांचे रसायन आणि साहित्य नष्ट केले असून या कारवाईत पोलीस निरीक्षक देविदास चोपडे पोहेका प्रकाश गेडाम पोहेका गजानन चौधरी पो का पवन राऊत पिठलेवाड रणमले राठोड यांनी कारवाई केली असून ठाणे आमलदार सौ पुष्पा पुसनाके यांनी गुन्हे दाखल केले आहेत



## श्री जी पी नगरकर निवासी मूक–बधिर विद्यालयात 'शिवजन्मोत्सव'उत्साहात;चिमुकल्या हातांनी केले रयतेच्या राजाचे पूजन!

# मूक पाखरांच्या भावविश्वात शिवरायांचा जागर;३९६ व्या जयंतीनिमित्त देगलूरमध्ये भक्तीमय वातावरण

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । प्रतिनिधी**

शब्दांची मर्यादा असली तरी मनातील अमाप ऊर्जा आणि शिवरायांप्रती असलेली अढळ श्रद्धा... याचा प्रत्यय आज देगलूरमध्ये आला. विकास शिक्षण संस्थेच्या श्री जी.पी. नगरकर निवास मूक–बधिर विद्यालयात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती अत्यंत दिमाखात साजरी करण्यात आली.

चिमुकल्या शिवभक्तांच्या हस्ते पूजन

कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत भावपूर्ण वातावरणात झाली. शाळेचे मुख्याध्यापक ए.व्हि. सरसंबे सर आणि विद्यालयातील चिमुकल्या मूक–बधिर विद्यार्थ्यांच्या कोमल हातांनी शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. आपल्या लाडक्या राजाला वंदन करताना या चिमुकल्यांच्या डोळ्यातील चमक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.



विचारांचे सोने लुटले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापक ए.व्हि. सरसंबे सर यांनी भूषवले. वा उ तज्ञ बी.एम. साखरे यांनी आपल्या प्रास्ताविकातून शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा दिला, तर शाळेचे विशेष शिक्षक डी. एस. येंडे सर यांनी शिवविचारांची आजच्या काळातील गरज यावर मार्मिक मनोगत व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार सांकेतिक भाषेसह सूत्रसंचालन मारोती कुडकेवार यांनी केले.

यावेळी या उत्साह सोहळ्याला उपस्थिती श्रीमती गंगाबाई मरखले, वसंत पवार, विलास कोकणे, मारुती कुडकेवार, निर्मला बोधणें , सविता पेडेवार यांसह शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मूक–बधिर बाल शिवभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. छत्रपती शिवाजी महाराज की जय च्या जयघोषाने आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहाने संपूर्ण शाळा परिसर शिवमय झाला होता.

# अर्धापुरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य आरोग्य व रक्तदान शिबीर

## शेकडो नागरिकांनी घेतला लाभ

दैनिक वादळ वार्ता

**अर्धापूर । प्रतिनिधी**



अर्धापूर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून अर्धापूर येथे भव्य आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात केवळ आरोग्य तपासणीच नाही, तर गरजू रुग्णांवर प्रत्यक्ष औषधोपचारही करण्यात आले. या शिबिराला शिवप्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. 'जय भवानी, जय शिवाजी' जय जिजाऊ जय शिवराय च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. सामाजिक बांधिलकी जपत शिवजयंती साजरी करण्याच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या शिबिरामध्ये नागरिकांसाठी विविध आरोग्य चाचण्यांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये प्रामुख्याने रक्तदान शिबीरामध्ये तरुणांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक कर्तव्य पार पाडले.मधुमेह व रक्तदाब तपासणी अनेकांनी करून घेतली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रकारच्या आजारांचे निदान करण्यात आले. केवळ तपासणीवर न थांबता, पात्र रुग्णांना जागेवरच आवश्यक औषधे उपलब्ध करून देण्यात आली. या सामाजिक उपक्रमाला प्रशासकीय आणि पोलीस दलातील अधिकाऱ्यांनी भेटी देऊन आयोजकांचे कौतुक केले. यावेळी प्रामुख्याने उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ, नायब तहसीलदार राजेंद्र शिंदे, गटविकास अधिकारी यु. डी. तोटावाड, ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. विद्या झिने, सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णूकांत कराळे, पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले, सुभाष मुंगल, डॉ.उत्तम इंगळे, डॉ.विशाल लंगडे, डॉ.युवराज डाढाळे यांच्यासह ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि सर्वपक्षीय पदाधिकारीसह शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी अनेकांनी परिश्रम घेतल

# पाटागुडा येथील ग्रामस्थांचा सार्वत्रिक निवडणुकीवर बहिष्कार

## तहसीलदार ,गटविकास अधिकारी यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**जिवती । प्रतिनिधी**

जिवती तालुक्यातील शेवटच्या टोकावर कोरपणा तालुक्याच्या सिमा लगत असलेल्या डोंगर पायथ्याशी गट ग्रामपंचायत धनकदेवी मध्ये येत असलेल्या पकडी गुड्डम धरणा जवळ पाटागुडा आदिवासी वस्ती जवळपास पंचवीस कुटुंबाचे वास्तव्य मात्र, त्या ठिकाणी जाण्या येण्याचा रस्ता व पाण्याची गंभीर परिस्थिती असल्यामुळे येथील ग्रामस्थांचे जगणे कठीण झाले आहे.पाटागुडा येथे पाच वर्षा पूर्वी रोडचे व पुलाचे बांधकाम करण्यात आले मात्र, दोनच महिन्यात पुरामुळे पूल वाहून गेले तेव्हा पासून पाटागुडा येथील ग्रामस्थाना जान्यायेण्या साठी जीवमुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात जवळ पास धरणाच्या नरहात सहा महिने पाणी राहत असल्याने मार्ग बंद असतो.दुसरा



पर्यायी मार्ग नसल्याने पावसाळ्यात पायी प्रवास करून आपल्या गरजा भागवीत आहे.गावात शाळा नसल्याने मुले शिक्षणापासून वंचित राहत आहे. आरोग्याची बिकट समस्या गावात रुग्णवाहिका येत नाही त्यामुळे रुग्णांना बैलबँडीने उपचारासाठी प्रवास करावा लागतो. तर महिलांच्या प्रस्तुतीची बिकट परिस्थिती पाटागुडा येथील महिलांना प्रस्तुती पूर्वी एक दोन महिण्या अगोदर जवळपासच्या नातेवाईकांच्या घरी ठेवून प्रस्तुती करून घेण्याची नामुस्की येथील ग्रामस्थानवर येत आहे. पाटागुडा येथे पाणी पुरवठा बंद आहे गेल्या कित्येक महिन्यापासून पाणी टंचाई आहे.पाणी साठवणुकीची सिंटेक्स टाकी जोरदार वाऱ्या मुळे जमिनीवर पडली तसेंच सोलर प्लन च्या प्लेटा वाकडेतिकडे झाल्या त्यामुळे पाणीपुरवठा बंद आहे. मात्र, ग्रामस्थाच्या समस्याकडे कोणीही लक्ष देत नाही. याबाबत ग्रामपंचायत प्रशासनाकडे तक्रारी झाल्या. निवेदन देण्यात आले मात्र, आज पर्यत रस्ता व पाणी समस्या बाबत मार्ग निघाला नाही शेवटी ग्रामस्थानी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला असून ग्रामस्थानी मा.तहसीदार जिवती मा.गटविकास अधिकारी प.स.जिवती यांना लेखी निवेदन देऊन समस्या मांडल्या जोपर्यत पाटागुडा येथील समस्याचे निराकरण होत नाही. तोपर्यत निवडणुकीवर बहिश्कारावर ठाम राहणार असल्याचे निवेदनातून व्यथा मांडण्यात आले.

# पानकनेरगावात बिबट्याची चर्चा तीन शेळ्या दगावल्या तर एक शेळी जखमी

## घटनास्थळी वन विभागाची धाव



दैनिक वादळ वार्ता

**सेनगाव । प्रतिनिधी**

सेनगाव तालुक्यातील पान कनेरगाव येथे गजानन भास्करराव देशमुख यांच्या शेतामध्ये सकाळी नऊ ते दहा च्या दरम्यान वडील भास्करराव देशमुख हे घरी आल्यानंतर बिबट्यांनी तीन शेळ्या खाल्ल्याची चर्चा मोठ्या वेगाने झाली असून बिबट्याने तीन शेळ्यांना चावा घेऊन मृत्यू मुखी पाळले तर एका शेळीला जखमी केले आहे, घटनास्थळी गजानन देशमुख यांनी वन विभागाला फोन द्वारे माहिती दिली असता सेनगाव येथील वन विभागाचे पथक घटनास्थळी रवाना झाले पुढील प्रक्रिया वन विभाग करीत असून सध्या पानकनेरगाव शेत शिवारामध्ये बिबट्या आल्याची मोठी चर्चा झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, दररोज प्रमाणे दि२१ फेब्रुवारी रोजी भास्कर देशमुख हे शेळ्यांना चारा पाणी करून नऊ वाजता घराकडे गेले होते परत साडेदहा ते अकरा वाजता शेतामध्ये आल्यानंतर तीन शेळ्या मृत्यूमुखी पडल्याचे त्यांना समजले तर एक शेळी जखमी झालेल्या अवस्थेत दिसून आली घटनास्थळी आरडाओरड झाल्याने जवळचे नागरिक आले नंतर गजानन देशमुख यांना फोन लावण्यात आला गजानन देशमुख यांनी वन विभाग यांना तात्काळ कळवले व घटनास्थळी वन विभागाचे पथक दाखल झाले तर पुढील तपास वन विभाग हे करीत आहे,

# शिवजयंतीनिमित्त उमरी येथे तालुका स्तरीय निबंध, वक्तृत्व स्पर्धा संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**उमरी । प्रतिनिधी**

उमरी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गोदावरी शिक्षण संस्थेच्या वतीने गोदावरी शिक्षण संस्था तळेगाव च्या वतीने दरवर्षी प्रमाणे ह्याही वर्षी तालुकास्तरीय वक्तृत्व, निबंध स्पर्धेचे आयोजन संस्थेच्या गिरीष देशमुख इंग्लिश स्कुल , विद्याभारती ज्यु. कॉलेज उमरी येथे केले गेले.

या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्वाती वचेवार मॅडम हे होते. परीक्षक म्हणून मान्यवर शिक्षक श्री.गणपत चव्हाण सर व श्री.गणेश इंगळे सर साहित्य क्षेत्रातील जाणकार, शिवव्याख्याती कु. संजीवनी शिंदे बाचेगावकर हे उपस्थित होते. स्पर्धेचे विषय समकालीन घडामोडी, सामाजिक जाणीवा व राष्ट्रप्रेम या विषयांवर आधारित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या विचारांची मांडणी प्रभावीपणे करत उपस्थितांची दाद मिळवली.निबंध स्पर्धेचा निकाल:प्रथम क्रमांक – कु.ऋतुजा ढगे गिरीष देशमुख इंग्लिश स्कुल उमरी

द्वितीय क्रमांक – कु.वेदिका हिवराळे विद्याभारती ज्यु. कॉलेज उमरी तृतीय क्रमांक – कु.श्रुतिका किनेवाड वक्तृत्व स्पर्धेचा निकाल:प्रथम क्रमांक – कु.सृष्टी शिवाजी सावंत जि.प.प्रा. शाळा बळेगाव द्वितीय क्रमांक – कु.क्रांती चव्हाण गिरीष देशमुख इंग्लिश स्कुल उमरी तृतीय क्रमांक – कु.स्नेहा किशन जाधव जि. प. के. प्रा. शाळा बितनाळ यांनी क्रमांक पटकावले विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सहभागी सर्व विद्यार्थ्यांनाही सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रमेश हैबते, शिवानी चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. श्रीनिवास जाधव यांनी मानले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये लेखनकौशल्य व वक्तृत्वकौशल्य विकसित होण्यास मोठी चालना मिळाल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.



# 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुरजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमनिमित्त मुंबईतील सुमारे ७ लाख विद्यार्थी समूह गीत गायन करुन रचणार विक्रम

## बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व महानगरपालिका प्राथमिक, माध्यमिक, खाजगी अनुदानित, विना अनुदानित व अन्य मंडळांच्या एकूण २ हजार ३२१ शाळांमध्ये होणार उपक्रम

## राज्यभरातून ५१ लाख विद्यार्थी सहभागी होणार, 'बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स' कडून विक्रमासाठी नोंद

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**


आज महाराष्ट्र शासनाचे अल्पसंख्याक विकास विभाग तसेच राज्यस्तरीय समागम समितीद्वारा 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर साहिबजी ३५० वा शहीदी समागमचे दिनांक २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६ रोजी नवी मुंबई येथे आयोजन करण्यात आले आहे. आज यानिमित्ताने 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या जीवनप्रवासावर आधारित गीताचे मुंबईतील ७ लाख १४ हजार ६२६ विद्यार्थी सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी समूह गायन करणार आहेत. यापैकी सकाळच्या सत्रातील विद्यार्थीही सकाळी ९ वाजता तर दुपारच्या सत्रातील विद्यार्थी दुपारी १ वाजता शाळेच्या परिपाठावेळी गायन करतील.

आज बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्यावतीने अखत्यारीतील सर्व महानगरपालिका प्राथमिक, माध्यमिक, खाजगी अनुदानित, विना अनुदानित व अन्य मंडळांच्या एकूण २ हजार ३२१ शाळांमधील विद्यार्थ्यांसह राज्यभरातील सुमारे ५१ लाख विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होणार आहेत. 'बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स' कडून या विक्रमासाठी नोंद घेण्यात येत आहे.आज महाराष्ट्र शासनाचे अल्पसंख्याक विकास विभाग तसेच राज्यस्तरीय समागम समितीद्वारा 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर साहिबजी ३५० वा शहीदी समागमचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते रात्री १० वाजेदरम्यान ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर, नवी मुंबई येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने उपायुक्त (परिमंडळ-६) श्री. संतोषकुमार धोंडे यांच्या मार्गदर्शनात बृहन्मुंबई महानगरपालिकेचे शिक्षण आणि आरोग्य विभाग यांच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी वाचन, वक्तृत्व, चित्रकला, निबंध आदी स्पर्धांचे तसेच प्रभात फेरी, आरोग्य शिबीर आदी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ करण्यासाठी 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या जीवनप्रवासावर आधारित प्रसिद्ध गायक सरताज सिंग यांनी स्वरबद्ध केलेल्या गीताचे सामूहिक गायन करण्यात येणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व महानगरपालिका प्राथमिक, माध्यमिक, खाजगी अनुदानित, विना अनुदानित व अन्य मंडळांच्या एकूण २ हजार ३२१ शाळांमधील ७ लाख १४ हजार ६२६ विद्यार्थी सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी विविध ठिकाणांहून एकाचवेळी हे समूह गायन करतील. यापैकी सकाळच्या सत्रातील विद्यार्थी सकाळी ९ वाजता तर दुपारच्या सत्रातील विद्यार्थी दुपारी १ वाजता शाळेच्या परिपाठावेळी समूह गायन करतील. तर, संपूर्ण राज्यभरातील सर्व शाळांमधून सुमारे ५१ लाख विद्यार्थी यात सहभागी होतील.

# मुस्तापूर येथील हनुमान मंदिर कलशारोहण सोहळा उत्साहात

दैनिक वादळ वार्ता
**हनुमंत । चंदनकर नांदेड**

नांदेडच्या नायगाव तालुक्यातील मुस्तापूर येथील हनुमान मंदिर कलशारोहण सोहळा १०८ विरुपाक्ष शिवाचार्य महाराज गणाचार्य मंठ संस्थान मुखेड महंत श्री आनंदपुरी महाराज चोळाखा यांच्या शुभहस्ते कलशारोहण आज दिनांक २० फेब्रुवारी रोजी हाजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला सकाळी यज्ञ कलश अभिषेक मारूतीच्या अभिषेक आरती करून कलशारोहण करण्यात आले कार्यक्रमाला दिगांबर महाराज गडगा संतोष महाराज पुरी नायगाव मतदार संघाचे आमदार राजेश पवार नांदेड जिल्ह्याचे खासदार रवींद्र पाटील चव्हाण,



संजय आप्पा बेळगे, शिवराज पाटील होटाळकर सुभाषराव मुंके डोनगांवकर भजनी मंडळ साधू संत महंत टाळकरी माळकरी यासह हाजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# बीडमध्ये 'माझी आई नानीबाई आदर्श माता' पुरस्कार व जिल्हास्तरीय स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

सरस्वती विद्या मंदिर माध्यमिक विद्यालय येथे स्वर्गीय वामनदादा पवार यांच्या स्मरणार्थ आयोजित जिल्हास्तरीय रंगभरण, निबंध लेखन स्पर्धांचा बक्षीस वितरण आणि 'माझी आई नानीबाई आदर्श माता' पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला.



कार्यक्रमाचे अध्यक्षपद दादासाहेब मुंडे यांनी भूषवले, तर प्रमुख व्याख्याते म्हणून पांडुरंग सुतार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लक्षणीय होती. सौ. सविता मोहनराव रणदिवे (अकलूज)व सौ. कांता संतोष सोनवणे यांना विशेष पुरस्कार देण्यात आला . तर सौ. मीनाक्षी भास्कर वडमारे, श्रीमती सविता मनोहर पंडित, सौ. शकुंतला किसन शीलवंत यांना आदर्श माता पुरस्कार देण्यात आला. या सोहळ्याला उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, पीएसआय प्रवीण कुमार बांगर, दीपक घुमरे (अध्यक्ष, शिक्षण संस्था महामंडळ), ड. विश्वनाथ मगर, नगरसेवक प्रमोद अण्णा शिंदे, आरती रणजीत बनसोडे, सुभाष पवळ, महादेव काळे, बाबासाहेब धुताडमल, वैभव स्वामी, रोहिदास रोहिटे, वशिष्ठ बडे सर आणि किशोर घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन उत्तम पवार (सचिव, सरस्वती विद्या मंदिर), बाबूलाल पवार (संचालक) यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# शिवप्रेमींसाठी सचिन साखरे व गणेश काळदाते यांचा आदर्श सेवा उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

शिवजयंती सोहळ्या निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही पत्रकार तथा चहा हॉटेल व्यावसायिक सचिन धनराज साखरे यांनी शिवप्रेमींसाठी चहा व शुद्ध पाण्याची उत्तम व्यवस्था करून समाजा समोर आदर्श निर्माण केला.समाज जाणिवेतून गेली अनेक वर्षे ते हा उपक्रम सातत्याने राबवत असून त्यांच्या या सेवाभावी वृत्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.या उपक्रमाला दरवर्षीप्रमाणे यंदाही मराठवाडा दूध डेअरीचे मालक गणेश काळदाते यांनी मोलाचे सहकार्य केले.दोघांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या अनेक वर्षांपासून हा सामाजिक उपक्रम अविरतपणे सुरू आहे. शिवजयंतीसारख्या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी सोहळ्यात




शिवप्रेमींसाठी विनामूल्य चहा व पाण्याचीव्यवस्था करणे ही केवळ सेवा नसून छत्रपतींच्या विचारांना अभिवादन करण्याची एक प्रेरणादायी कृती असल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.यावर्षीची शिवजयंती डीजे मुक्त जयंती म्हणून साजरी करण्यात आल्या मुळे वातावरण अधिक उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध होते.तरुणाई सोबतच महिला,ज्येष्ठ नागरिक तसेच बालकांची उपस्थिती लक्षणीय प्रमाणात होती. वाढलेल्या सहभागामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वृद्धिंगत झाली. सर्व स्तरातून अशीच शिस्तबद्ध,सांस्कृतिक आणि प्रेरणादायी शिवजयंती भविष्यातही साजरी व्हावी,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.सचिन साखरे आणि गणेश काळदाते यांनी सातत्याने राबविलेल्या या उपक्रमाबद्दल पंचक्रोशीतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.मित्रपरिवार व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.समाजसेवेची ही परंपरा येणाऱ्या अनेक वर्षांपर्यंत त्यांच्या हातून अखंडपणे सुरू राहो, हीच सर्वांची मनापासून अपेक्षा व्यक्त होत आहे.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांचीता.केज शाळेत दि.२० फेब्रुवारी २०२६ शुक्रवार रोजी मराठी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म दि.२० फेब्रुवारी १८१२ रोजी महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभुर्ले येथे झाला.वडील गंगाधर शास्त्री होते.ते मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक, आद्य पत्रकार,शिक्षक व समाजसुधारक होते. त्यांनी दि.६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले.त्यानिमित्ताने ६ जानेवारी हा पत्रकार दिन साजरा केला जातो. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी मोलाचे कार्य केले.त्यांनी 'दिग्दर्शन' हे पहिले मासिक सुरू केले.त्यांना



आद्य समाजसुधारक मानले जाते.असे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.या शाळे तील प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री.डॉ. रामकिशन ग्यानबा मुळे सर,गणित विज्ञानचे प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री.संदीप मेघराज ठोंबरे सर,श्री. आकाश दत्तात्रय लोंढे सर,श्री.राहुल बजरंग बचुटे सर,श्री.आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती अंजलीगोविंदराव उटीकर मॅडम,श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम,ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम यांनी सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमास या शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका वृंद,पिएम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार स्वर्णमाला पवार, अनिता पवार, विद्यार्थी, विद्यार्थिनी,शिक्षणप्रेमी नागरिक, अंगणवाडीताई, मदतनिस हे उपस्थित होते.

# तुकोबांच्या भक्ति रंगात पावनधाम न्हाऊन निघणार,अखंड हरिनाम सप्ताह,श्रीमद् भागवत कथा व भव्य गाथा पारायण सोहळ्याची भक्तिमय पर्वणी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळ्या निमित्त औरंगपूर येथे प्रति देहू श्रीक्षेत्र पावनधाम येथे अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा व भव्य गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.हा आठ दिवसीय भक्तिमय सोहळा दि.२६ फेब्रुवारी २०२६ गुरुवार रोजी प्रारंभ होऊन दि.०५ मार्च २०२६ गुरुवार रोजी सांगता होणार आहे.या सप्ताहामुळे संपूर्ण परिसरात भक्ती, नामस्मरण आणि अध्यात्मिक वातावरणाची निर्मिती होणार आहे.सप्ताहाच्या दरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ७ ते १२ गाथा पारायण,दुपारी २ ते ५ श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ कीर्तन,संगीत भजन व हरिजागर असादैनंदिन कार्यक्रम राहणार आहे.




या सप्ताहात विविध मान्यवर कीर्तनकारांची उपस्थिती लाभणार आहे.दि.२६ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.एकनाथ महाराज हांडे पंढरपूर, दि.२७ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.डॉ.रामकृष्ण महाराज लहवितकर नाशिक,दि.२८फेब्रुवारी रोजी ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणा,दि.०१ मार्च रोजी ह.भ.प.श्रीगुरु पुंडलिक महाराज देहूकर यांचे कीर्तन होणारअसून प्रवचन ह.भ.प.देवव्रत राणा महाराज वासकर यांचे राहील.दि.०२ मार्च रोजी ह.भ.प.उमेश महाराज दशरथे आळंदी देवाची यांचे कीर्तन व ह.भ.प.योगी निरंजन नाथजी महाराज विश्वस्त श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी यांचे प्रवचन होईल.दि. ०३ मार्च रोजी ह.भ.प. विश्वनाथ महाराज वारींगे मुंबई तर दि.०४ मार्च रोजी ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापूरकर यांचे कीर्तन होईल.व दि. ५ मार्च रोजी महंत ह.भ.प.श्री महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या किर्तनाने या सोहळ्याची सांगता होईल.त्या नंतर महा प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.श्री. नामदेवराव इंदरराव गोरे, सुभद्रा इंडस्ट्रीज ग्रुप पुणे व समस्त गोरे परिवार यांच्या वतीने महाप्रसादा ची व्यवस्था करण्यात आली आहे.श्री जगद्गुरू तुकोबाराय पावनधाम विश्वस्त मंडळ,प्रति देहू श्रीक्षेत्र पावनधाम, औरंगपूर यांच्या वतीने हा सोहळा आयोजित करण्यात आला असून दि.०५ मार्च २०२६ रोजी संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळ्या निमित्त परिसरातील गावातून दिंड्या येऊन सप्ताहात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सर्व भाविकांनी या नामसप्ताहात सहभागी होऊन कीर्तन-भजनाचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शाळा मुल्यांकन व आश्वासन आराखडा स्काफ मुल्यांकनात साने गुरुजी निवासी विद्यालय या शाळेला अ प्लस श्रेणी प्रदान




दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्या साठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली असून त्यानुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळां साठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडचाची (SQAAF) निर्मिती करण्यात आलेली आहे. या मुल्यांकनात येथील साने गुरुजी निवासी प्राथमिक विद्यालय, माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय या शाळांना अ प्लसश्रेणी हा दर्जा प्रदान करण्यात आल्याने या शाळेने नावलौकिक प्राप्त केल्या बद्दल संस्थेचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड साहेब,उपाध्यक्ष राजेश कापसे सर व संकुलाच्या प्राचार्या डॉ.कविता कराड गित्ते मॅडम यांचे शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे विविध स्तरातून कौतुक करुन अभिनंदन होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077